नाशिक जिल्हा परिषद नाशिक
वित्त विभाग
जा.क्र. जिपना/अर्थ/भांडार/ [illegible] /२०१७.
नाशिक दिनांक- १३/११/२०१७

प्रति,
खाते प्रमुख (सर्व) ----सा.प्र.वि.----------
जिल्हा परिषद, नाशिक

**विषय:-** शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदी बाबत.

**संदर्भ -** १) महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक-भांखस-२०१४ /प्र.क्र.८२/उद्योग -४, दिनांक ३०/१०/२०१५.
२) महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक-भांखस-२०१४ /प्र.क्र.८२/भाग।।।/उद्योग -४, दिनांक १/१२/२०१६
३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक जिपना/अर्थ/भांडार/५०३/२०१५ दिनांक २७/११/२०१५

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये जिल्हा परिषद, पंचायत समिती, इत्यादी अंतर्गत येणा-या कार्यालयांना विविध साधनसामग्रीची खरेदी करावी लागते. यासाठी Manual of office procedure for purchase of stores by the Government Departments-१९७८ तयार करण्यात आले होते. व ती नियम पुस्तीका आतापर्यंत वापरात होती.

महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक-भांखस-२०१४ /प्र.क्र.८२/उद्योग -४, दिनांक ३०/१०/२०१५ अन्वये सदर खरेदीची कार्यपध्दतीची नियमपुस्तिका राज्यास दिनांक ०१/११/२०१५ पासुन लागु करण्यात आली आहे. यापूढे खालील प्रमाणे सुधारीत खरेदी समिती स्थापन करुन खरेदी प्रक्रीया राबविण्यात यावी.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | संबंधीत खरेदीदार विभागाचा जिल्हा कार्यालय प्रमुख | अध्यक्ष | मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नाशिक (संबधित विभागानुसार) |
| २ | महाव्यवस्थापक ( जिल्हा उद्योग केंद्र ) / प्रतिनिधी | सदस्य | महाव्यवस्थापक ( जिल्हा उद्योग केंद्र ) यांचे प्रतिनिधी |
| ३ | लेखा व कोषागारे या कार्यालयाचा गट-अ / गट-ब दर्जाचा अधिकारी / प्रतिनिधी | सदस्य | मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद नाशिक |
| ४ | संबंधीत खरेदीदार विभागाचा खरेदी अधिकारी | सदस्य/ सचिव | संबंधित विभागाचे खाते प्रमुख |

यापूर्वी संदर्भ क्रमांक-३ अन्वये स्थापन केलेली खरेदी समिती रद्द करण्यात येत असुन, त्याऐवजी वरिल प्रमाणे खरेदी समिती स्थापन करण्यात येऊन त्याप्रमाणे खरेदी प्रक्रीया राबविण्यात यावी.

Deepa
13/11/17
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक